पुण्य नगरी मंगळवार ३० जुलै २०१९ पुणे 3

ZES's Zeal College of Engineering & Research
LIBRARY
802
ZCOER

# रेड हॅट जागतिक प्रमाणपत्र परीक्षेत झीलचे यश

**धायरी : प्रतिनिधी**

झील महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान विभागातील विद्यार्थ्यांनी 'रेड हॅट'च्या माध्यमातून घेण्यात आलेल्या जागतिक दर्जाचे प्रमाणपत्र परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. सदर परीक्षा 'रेड हॅट' या नामांकित कंपनीकडून घेण्यात आली होती.




या परीक्षेत महाविद्यालयाच्या दहा विद्यार्थ्यांनी यशस्वीरीत्या आरएचसीएसए परीक्षा उत्तीर्ण केली असून यापैकी ६ विद्यार्थ्यांनी ३०० पैकी ३०० गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक प्राप्त करून एक नवा आदर्श प्रस्थापित केला आहे. श्रीकृष्ण राजपुरोहित, करन चावला, ओंकार संकपाळ, जय अग्रवाल, अथर्व दवंदे, ओंकार पार्थे या विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले आहे. माहिती तंत्रज्ञान विभागातील रेड हॅट सेंटर ऑफ एक्सलन्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व परीक्षेचे आयोजन केले होते. मिळालेल्या यशामुळे विद्यार्थ्यांना भावी आयुष्यात विविध कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

पुढील काळात ओपन सोअर्स तंत्रज्ञानाचे जास्तीत जास्त वापर व्हावा, या उद्देशानेच झील महाविद्यालयाने झील रेड हॅट सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना केली होती आणि त्या अनुषंगाने या पहिल्याच बॅचची जागतिक परीक्षेतील यश केंद्राच्या उद्देशाला अधोरेखित करते.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे सचिव जयेश काटकर, संस्थेचे कार्यकारी संचालक प्रा. प्रदीप खांदवे, प्राचार्य डॉ. अजित काटे व विभागप्रमुख डॉ. योगेश गुरव यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. सदर विद्यार्थ्यांना प्रा. निहाल शिकलगार यांचे मार्गदर्शन लाभले.